**योजनांची मूल्यमापन पाहणी, नमुना सर्वेक्षण व सांख्यिकी सल्ला विषयक सेवा ही कामे करण्यासाठी नामांकित बाह्यस्थ संस्थांची नामिका सूची (Empanelment) तयार करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: मुमाअ १०१६/प्र.क्र.७८/का-१४१७**
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक: २६ सप्टेंबर, २०१७

<u>वाचा:-</u>

१. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक वियोमू-१९९८/प्र. क्र. ६/का-१४१३, दिनांक ३०.०९.१९९८.
२. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक वियोमू-१९९८/प्र. क्र. ६/का-१४१३, दिनांक ०७.०६.२००१.
३. शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक मुमाअ १०१६/प्र.क्र. ७८/का-१४१७, दिनांक २२.०७.२०१६.
४. शासन शुद्धीपत्रक नियोजन विभाग, क्र. मुमाअ १०१६/प्र.क्र. ७८/का-१४१७, दिनांक २१.११.२०१६.

**<u>प्रस्तावना:</u>**

योजनांची मूल्यमापन पाहणी, नमुना सर्वेक्षण व सांख्यिकी सल्ला विषयक सेवा ही कामे करण्यासाठी नामांकित बाह्यस्थ संस्थांची नामिकासूची (Empanelment) दिनांक २२/०७/२०१६ च्या शासन निर्णयानुसार तयार करण्यात आली आहे. नामांकित बाह्यस्थ संस्थांची नामिका सूची तयार करण्यासाठी गठीत केलेल्या समितीने सदर प्रक्रिया काही कालावधीनंतर पुन्हा राबविण्यात यावी अशी शिफारस केली होती. त्याअनुषंगाने नामिका सूची अद्यावत करण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्याची समितीने शिफारस केली होती. त्यास अनुसरून नव्याने समाविष्ट करावयाच्या संस्थांबाबत संचालनालयाच्या संकेतस्थळावरील ऑनलाईन प्रक्रियेने गट १, A-१ मधील ७ निविदा व B-१ मधील ४ निविदा दिनांक २३-१-२०१७ रोजी तर टपालाद्वारे ऑफलाईन पध्दतीने (गट २, A-२ मध्ये १ व B-२ मध्ये २) प्राप्त झालेल्या ३ निविदा अशा एकूण १४ निविदा दिनांक ९ फेब्रुवारी, २०१७ रोजी उघडण्यात आल्या. संबंधित निविदा दाखल करणा-या संस्थांना दिनांक २५-४-२०१७ रोजी ई-मेलद्वारे सादरीकरणासाठी आवश्यक कागदपत्रांसह समितीसमोर उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार

दिनांक ६ मे, २०१७ रोजी सादरीकरण व कागदपत्रे सादर करणा-या १० पात्र नामांकित बाह्यस्थ संस्थांचा नामिकासूचीत (Empanelment) समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक मुमाअ १०१६/प्र.क्र. ७८/का-१४१७, दिनांक २२-०७-२०१६ मधील परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेल्या संस्थांच्या यादीत समावेश करण्याकरीता खालील नमूद केलेल्या संस्थांच्या नामिका सूचीस (Empanelment) या शासन निर्णयाच्या दिनांकापासून ५ वर्षासाठी मान्यता देण्यात येत आहे. तदनंतर दर पाच वर्षांनी नियोजन विभागाकडुन आढावा घेण्यात येईल व आवश्यकता वाटल्यास पात्र संस्थांची नवीन सूची तयार करण्यात येईल. मूल्यमापन अभ्यास / नमुना सर्वेक्षण नामिका सूचीतील संस्थांकडून करुन घेण्याबाबत मार्गदर्शक सूचनांचे परिशिष्ट सोबत जोडले आहे.

**गट-१ प्रकार-१ (Category A१):** वाणिज्यिक संस्था-पूर्णत: राज्यस्तरावर किंवा १० अथवा त्यापेक्षा जास्त जिल्ह्यांमध्ये किंवा एकापेक्षा जास्त महसूली विभागासाठी पात्र संस्थांची यादी.

| Sr. No. | Agency Name & Address | Contact person | Contact No. & E-mail Id |
|---|---|---|---|
| 1 | Administrative Staff College of India, Hydrabad<br>Add:- Bella Vista, Raj Bhavan Road, Khairatabad, Hydrabad-500 082 | Sutanuka Dev Roy | 040 66533000,<br>07416808518<br>registrar@asci.org.in<br>sdevroy@asci.org.in |
| 2 | AFC India Ltd., Mumbai,<br>Add:-Dhabraj Mahal, 1st floor, Chhatrapati Shivaji Marg, Mumbai-400 001 | Dr. M. C. Pandey | 022 22028924,<br>09833628509<br>afcl@vsnl.com;<br>dr.mcpandey@gmail.com |
| 3 | Development and Research Services Pvt. Ltd, Delhi,<br>Add:- A/1 19, 1st floor, Safdarjung Enclave, New Delhi-110 029 | Dolon Roy | 011 26161061/<br>26177413/41694846<br>info@drsindia.org<br>dolon@drsindia.org |
| 4 | N.R. Management Consultants India Pvt Ltd, Delhi,<br>Add:- 55, Bhavani Kunj, opposite sector D-2, Vasant Kunj,<br>New Delhi-110 070 | Rahul Agrawal | 011 26895338,<br>09899984199<br>rahula@nrmc.co |

| | | | |
|---|---|---|---|
| 5 | Sambodhi Research and Communications Private Ltd, Noida, Uttar Pradesh<br>Add:- C-126, Sector 2, Noida-201301, Uttar Pradesh | Sudhanshu Malhotra | 0120 4056479, 09899382737, 08826630101<br>sudhanshu.malhotra@sambodhi.co.in |

**गट-१ प्रकार-२ (Category B १):** वाणिज्यिक संस्था-१० पेक्षा कमी जिल्ह्यात किंवा एका महसूली विभागासाठी पात्र संस्थांची यादी.

| Sr. No. | Agency- Name & Address | Contact Person | Contact No. or E-mail Id |
|---|---|---|---|
| 1 | Action For Agricultural Renewal In Maharashtra – AFARM, Pune<br>Add: 2/23, Raisoni Park, Market Yard, Pune-411 037 | Subhash M. Tamboli | 020 24264641/ 24268302,<br>9822752054<br>admin@afarm.org;<br>executivedirector@afarm.org |
| 2 | Vimarsh Development Solutions Private Limited, Gurgaon, Haryana<br>Add: 197, 1st floor, Udyog Vihar,Phase-IV, Gurgaon-122 016 | Udit Bhandari | 0124 2340280/281,<br>09899267377<br>admin@vimarsh.in<br>udit@vimarsh.in |
| 3 | Social Action for Rural Development (SARDA), Gondia,<br>Add: Near Bajarang Rice Mill, Dr. Lohia Ward, Behind Bharat Motor Driving School, Kudwa, Gondia-441614 | Pankaj A. Deokar | 0718 2251033,<br>09423193460<br>sardaamgoan@rediffmail.com<br>sardagroups@rediffmail.com |

**गट-२ प्रकार-१ (Category A२) :** शासन सहाय्यित संस्था-पूर्णत: राज्यस्तरावर किंवा १० अथवा त्यापेक्षा जास्त जिल्ह्यांमध्ये किंवा एकापेक्षा जास्त महसूली विभागासाठी पात्र संस्था.

| Sr. No. | Agency Name & Address | Contact person | Contact No. & E-mail Id |
|---|---|---|---|
| 1 | Indian Institute of Management (IIM), Ahmedabad,<br>Add: Heritage (old) Campus, Vastrapur Road, Ahmedabad-380 015 | Prof. Sebastian Morris | 079 66324884, 09824232121<br>customprograms@iima.ac.in<br>morris@iima.ac.in,<br>monazv@iima.ac.in |

**गट-२ प्रकार-२ (Category B २):** शासन सहाय्यित संस्था-१० पेक्षा कमी जिल्ह्यात किंवा एका महसूली विभागासाठी पात्र संस्था. (केवळ सांख्यिकी सल्लाविषयक कामांसाठी)

| Sr. No. | Agency- Name & Address | Contact Person | Contact No. or E-mail Id |
|---|---|---|---|
| 1 | Indira Gandhi Institute of Development & Research (IGIDR), Mumbai<br>Add: General Arun Kumar Vaidya Marg, Film city Road, Goregaon (East), Mumbai-400 065 | Jai Mohan Pandit | 022 28416505 / 28401336<br>postmaster@igidr.ac.in<br>jmpandit@igidr.ac.in<br>registrar@igidr.ac.in |

२. संदर्भाधीन अ.क्र. ३ येथील शासन निर्णयामधील सर्व तरतुदी या शासन निर्णयास लागू राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९२६१६०८२५७८१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Vijesing Fattesing Vasave

Digitally signed by Vijesing Fattesing Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7de9682e22326e67a2c7e4125e658721c298e35048adffdff595b37a1b194aa, cn=Vijesing Fattesing Vasave
Date: 2017.09.26 15:57:17 +05'30'

**( वि. फ. वसावे )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२

२) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ (सदर शासन निर्णय आपल्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय कार्यालये, मंडळे, महामंडळे, अंगिकृत उपक्रम यांच्या निदर्शनास आणावा).

३) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२

४) मा. विरोधी पक्ष नेते, विधान सभा / विधान परिषद, यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई-३२

५) मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)

६) विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)

७) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

८) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

९) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)

१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

११) अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२

१२) प्रादेशिक सहसंचालक (सर्व), अर्थ व सांख्यिकी संचालनालय,

१३) उपायुक्त (नियोजन) (सर्व), विभागीय आयुक्तांचे कार्यालय,

१४) जिल्हा नियोजन अधिकारी (सर्व), जिल्हाधिकारी कार्यालय,

१५) जिल्हा सांख्यिकी अधिकारी (सर्व), जिल्हा सांख्यिकी कार्यालय,

१६) नियोजन विभाग, सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई-३२.

१७) संबंधीत संस्था (अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत)

१८) निवड नस्ती (का. १४१७).

शासन निर्णय क्रमांक मुमाअ-१०१६/प्र.क्र.७८/का.१४१७ दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ सोबतचे

## परिशिष्ट

**(I) मूल्यमापन अभ्यास / नमुना पाहणी बाबत नामिका सूचीतील संस्थांकडून करुन घेण्याबाबत मार्गदर्शक सूचना.**

**अ) मूल्यमापन अभ्यास / नमुना पाहणी - (पुढे नमूद केलेले कामाचे टप्पे महत्त्वाचे असून कामाची व्याप्ती निश्चित करताना त्यांचा अंतर्भाव करण्यात यावा)**

१. पाहणीचे उद्दिष्ट निश्चित करणे.

२. मूल्यमापन अभ्यास / नमुना पाहणीसाठी अंमलबजावणीची कार्यपद्धती तयार करणे.

३. मूल्यमापन अभ्यास / नमुना पाहणी घेण्यासाठी पत्रके तयार करणे (Schedule / Questionnaire).

४. क्षेत्रकामाच्या दृष्टीने भौगोलिक व नमुना निवडीसाठी चौकट या संदर्भात पाहणीची व्याप्ती निश्चित करणे.

५. शासकीय यंत्रणेने निश्चित केलेल्या स्तरापर्यंत (एकत्रित / स्वतंत्ररित्या) विश्वसनीय अनुदान प्राप्त होण्यासाठी ठरवून दिलेल्या वित्तीय मर्यादा व प्रशासकीय व्यवहार्यता विचारात घेवून विश्वसनियतेची कमाल मर्यादा व नमूना निवडीतील त्रुटी किमान राहतील या दृष्टीने उपयुक्त नमुना निवड पध्दती व नमुना आकार सुचविणे. यास्तव आवश्यकता असल्यास पथदर्शी पाहणी घेणे.

६. क्षेत्रीय कर्मचाऱ्यांसाठी मार्गदर्शक सूचनापुस्तिका तयार करणे.

७. क्षेत्रकामासाठी प्रशिक्षण देणे.

८. प्रत्यक्ष क्षेत्रकाम करणे.

९. क्षेत्रकामाचे निरीक्षण / सनियंत्रण करणे व त्रुटी टाळण्याच्या दृष्टीने उपाययोजना आखणे.

१०. माहिती संकलन करणे (माहिती गोळा करणे, माहिती नोंदणी व एकत्रिकरण करणे)

११. संकलित माहितीचे वैधतीकरण करणे.

१२. वैधतीकरण केलेल्या माहितीचे तक्तीकरण करणे.

१३.तक्तीकरण केलेल्या माहितीचे विश्लेषण करणे.

१४. निष्कर्ष व शिफारशी यासह अहवाल सादर करणे.

१५. नामिका सूचितील संस्थांनी त्यांना सुपूर्द केलेल्या कामाअंतर्गत संकलीत केलेली मूळ आकडेवारी (Basic Data) शासकीय यंत्रणेस सुपूर्द करणे व त्याची प्रत अर्थ व सांख्यिकी संचालनालयास देणे.

टीप: १) उपरोक्त नमूद केलेल्या कार्यांपैकी ६, ७, ८, ९ व १० ही कार्ये शासनाच्या कार्यालयांनी वाणिज्यिक संस्थेकडे न सोपविता अंतर्गतरित्या पार पाडण्याची त्यांना मुभा राहील.

२) उपरोक्त टप्प्यांपैकी बाह्यस्थ संस्थांकडून करुन घ्यावयाची कामे निश्चित करण्याची मुभा शासनाच्या कार्यालयाला राहील.

**ब) सांख्यिकी विषयाबाबत सल्लागाराची कामे संस्थांकडून करुन घेण्यासाठी कामाची व्याप्ती (Scope of work) विभागांनी / शासकीय कार्यालयांनी निश्चित करावी.**

**(II) नामिका सूचीतील संस्था निवडीबाबत सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना**

१. सदर शासन निर्णयात नमूद केल्यानुसार संस्थांचे गट-१ वाणिज्यिक संस्था, गट-२ शासकीय व शासन अनुदानित संस्था या दोन गटात वर्गीकरण करण्यात आले आहे. तसेच राज्यस्तरावरील कामांसाठी A१, A२ आणि स्थानिक स्तरावरील कामासाठी B १ व B २ या प्रकारात संस्थांची विभागणी केली आहे. तेव्हा शासनाच्या विभागांनी / कार्यालयांनी प्रथम आवश्यक असलेली कामे करुन घेण्यास गट व वर्ग निश्चित करावा व संबंधीत गटातून मर्यादित स्वरुपाच्या निविदा मागवाव्यात.

२. कामाची व्याप्ती निश्चित करावी किंवा निवडलेल्या गटातील संस्थांकडून तसा प्रस्ताव मागवून त्या आधारे व्याप्ती निश्चित करावी.

३. स्विकृत कामाच्या व्याप्तीवर आधारित वाणिज्यिक प्रस्तावासाठी मर्यादित निविदा नामिका सूचीतील संबंधीत गट व वर्गातील संस्थांकडून मागविण्यात याव्यात.

४. संस्थांचा गट व वर्ग निवडीसाठी निकष पुढीलप्रमाणे.

i. मूल्यमापन / नमुना पाहणी ही पूर्णत: राज्यस्तरावर किंवा १० अथवा त्यापेक्षा जास्त जिल्ह्यांमध्ये किंवा एकापेक्षा जास्त महसूली विभागात राबविली जात असेल तर फक्त A१ किंवा A२ वर्गातील संस्था सहभागी होण्यास पात्र राहतील. अशा प्रकरणी संस्थांच्या वाणिज्यिक प्रस्तावांचे मूल्यमापन करुन न्युनतम दर (L१) नमूद करणाऱ्या संस्थेची निवड करावी. या व्यतिरिक्त संस्थांच्या प्रस्तावाचे तांत्रिक / वाणिज्यिक संयुक्त मूल्यमापन करुन संस्थेची निवड करता येऊ शकेल म्हणजेच न्युनतम दर किंवा तांत्रिक वाणिज्यिक संयुक्त मूल्यमापनाचे आधारे संस्था निवडीचे पर्याय उपलब्ध आहेत.

ii. मूल्यमापन / नमुना पाहणी ही जर राज्यातील १० पेक्षा कमी जिल्ह्यात किंवा एका महसूली विभागाकरीता असेल तर B १ आणि B २ या दोन्ही प्रकारातील संस्था सहभागी होण्यास पात्र आहेत. अशा प्रकारात संस्था निवडीसाठी वाणिज्यिक मूल्यमापन करुन न्यूनतम दर नमूद करणाऱ्या संस्थेची निवड करावी. स्थानिक स्तरावरील मूल्यमापनासाठी A१ वर्गातील संस्था देखील पात्र आहेत. या संस्थांना मर्यादित निविदा पध्दतीत सहभागी होण्यास निमंत्रित करण्याची शासकीय कार्यालयांना मुभा राहील व अशा परिस्थितीत शासनाच्या कार्यालयांनी निविदांचे तांत्रिक व वाणिज्यिक (Techno Commercial) असे संयुक्त मूल्यमापन करावे. यास्तव तांत्रिकसाठी २५ टक्के व वाणिज्यिकसाठी ७५ टक्के हे सूत्र वापरण्याचा पर्याय उपलब्ध आहे.

iii. शासकीय यंत्रणा ह्या मूल्यमापन पाहणी / नमुना पाहणीसाठी गट-२ मधील संस्थांकडून दिशादर्शक अहवाल व वाणिज्यिक प्रस्ताव मागवून त्यांना थेट स्वेच्छाधिकारात कामे देवू शकते. अशा प्रकरणी गट-२ मधील संस्थांनी दिलेले वाणिज्यिक प्रस्ताव वाजवी असल्याचे संबंधीत शासकीय यंत्रणेने खात्री करावी.

iv. उपरोक्त सूचना ह्या मार्गदर्शक स्वरुपाच्या असून काही अडचणी असल्यास अर्थ व सांख्यिकी संचालनालयाशी संपर्क साधावा.

Vijesing Fattesing Vasave

Digitally signed by Vijesing Fattesing Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7de9682e22326e67a2c7e4125e658721c298e35048adffdff595b37a1b194aa, cn=Vijesing Fattesing Vasave
Date: 2017.09.26 15:58:15 +05'30'

**( वि. फ. वसावे )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन